imma™

# Saamana

## Demage Cranes opens new facility for India market

**Date: 13-07-2010 | Edition: Pune | Page: 8 | Source: Bureau | Clip size (cm): W: 7 H: 8**



# चाकणमध्ये डिमॅग क्रेन्स निर्मिती प्रकल्पास सुरुवात

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) - विविध प्रकारच्या अवजड उद्योगांमध्ये वापरण्यात येणाऱ्या क्रेन्सचे उत्पादन करणाऱ्या जर्मनीतील डिमॅग क्रेन्स या कंपनीच्या पुण्यातील चाकण येथील क्रेन्सनिर्मिती प्रकल्पाचे उद्‌घाटन उद्योजिका अनु आगा, कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी थॉमस हेगन, कंपनीच्या उपविभागाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास बक्षी यांच्या हस्ते झाले. या ठिकाणी दरवर्षी विविध प्रकारांतील सहाशे क्रेन्स तयार करण्यात येणार आहेत.

थॉमस हेगन, सुहास बक्षी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. थॉमस हेगन म्हणाले, हिंदुस्थानातील बाजारपेठेत जर्मनीतील तंत्रज्ञांनी तयार केलेल्या उत्पादनांना मोठी मागणी आहे. नवीन प्रकारच्या क्रेन्सचे उत्पादन करून ते उद्योगांना पुरविण्यासाठी या प्रकल्पाद्वारे प्रयत्न करण्यात येणार आहेत. या ठिकाणी आठ दशलक्ष युरो गुंतविण्यात येणार आहेत.

डिमॅग क्रेन्स १९९८ पासून हिंदुस्थानात कार्यरत आहे. कंपनीने जागतिक दर्जाचे उत्पादने तयार केली असून, मेट्रो प्रकल्प, टाटा, टोयोटा, भारत फोर्ज, अशोका लेलँड या त्यांच्या काही ग्राहक कंपन्या आहेत. दिल्लीतील मेट्रो प्रकल्पासाठी या कंपनीच्या क्रेन्सचा उपयोग करण्यात आला. चाकणमधील प्रकल्प १२.७ एकर जागेवर विस्तारलेला असून, या ठिकाणी दरवर्षी विविध प्रकारच्या ६०० क्रेन्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय क्रेन्सच्या सुट्ट्या भागांचे उत्पादन करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.